पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८
कामगार कल्याण विभाग
जा. क्र. काक/०३/कावि/२०१/२०२१
दिनांक०५/०७/२०२१

विषय :- कामगार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ :- १) मा. आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र. काक/३/कावि/१६९/२०१३दि.१९/०३/२०१३

२) मा. आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र. काक/३/कावि/१८०/२०१४दि.२४/०६/२०१४

३) मा. आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र. काक/३/कावि/१८८/२०१८दि.१९/०७/२०१८

४) मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/९४/२०२०दि.१९/०३/२०२०

५) मा. आयुक्त यांचेकडील दिनांक २५/६/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कामगारांचे किमान वेतनाचे दर संदर्भिय क्र.४ अन्वये दिनांक ०१/०१/२०२० पासून निर्धारित केले आहेत सदर आदेशाची अंमलबजावणी करणेची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची आहे.

कामगार कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे दायित्व मुख्य मालक (Principle Employer) म्हणून महानगरपालिकेचे आहे. कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कामगारांना किमान वेतन दराने वेतन दिले जात आहे. किंवा कसे ? तसेच इतर अनुषंगिक कामगार कायद्यानुसार देय असलेले संपूर्ण लाभ दिले जात आहे किंवा कसे ? यांची कंत्राटदाराने बीलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरून खातरजमा करुनच देयके अदा करणेबाबतचे निर्देश संदर्भिय क्र. १ ते ४ अन्वये वेळोवेळी देणेत आले आहे. त्याबाबतची अंमलबजावणी विभागप्रमुखांनी काटेकोरपणे करावी.

संदर्भिय क्र. ४ अन्वये निर्धारीत केलेल्या किमान वेतनाचे दरामध्ये सेवाशुल्क ५% निर्धारीत केले आहेत. सर्व कंत्राटदार व्यवसायिक हेतू ठेवूनच निविदाप्रक्रियेत सहभागी होतात. निविदेकरिता सेवा शुल्क ०% असलेस त्यातून कंत्राटदाराना कोणताही नफा होत नाही. त्यामुळे कंत्राटदार हे त्यांचेकडील कामगारांना किमान वेतन दरापेक्षा कमी वेतन देऊन किमान वेतना प्रमाणे वेतन दिले असे कागदोपत्री दाखवून कामकाज करतात. तसेच कामगारांना सुरक्षा साधने न देणे, कामकाजाकरिता कमी गुणवत्तेने किंवा कमी प्रमाणात साहित्य वापरणे अशा प्रकारे नफा / खर्चाची भरपाई केली जाऊ शकते त्यामुळे कंत्राटदाराकडून गुणवत्ता पूर्वक काम होणे शक्य नाही. अशा परिस्थिती मध्ये कंत्राटदाराकडून कामगार कायद्याचे उल्लंघन केले जाते. कंत्राटदार कामगार कायद्याचे पालन करीत नसलेने मनपास न्यायालयीन प्रकरणास सामोरे जावे लागून मनपाचे आर्थिक नुकसान होणेची शक्यता नाकारता येत नाही. प्रकरणी संदर्भिय क्र. ५ अन्वये मनुष्यबळ पुरवठा करावयाचे कामामध्ये सेवा शुल्क ०% प्राप्त झालेस सदरची निविदा स्विकृती न करणेस मा. आयुक्त सो यांनी मान्यता दिली आहे.

तरी या परिपत्रकाद्वारे विभागप्रमुखांना पुनश्चः कळविणेत येते की, संबंधित विभागांनी संदर्भिय क्र. १ ते ४ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच मनुष्यबळाची सेवा घेवून करणेत येणा-या कामाकरिता प्रसिद्ध होणा-या सर्व निविदांमध्ये सेवा शुल्काचे दर ०% प्राप्त झालेस सदरची निविदा स्विकृत करू नये.

(प्रमोद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८